



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०१ ● अंक : २९० ● मंगळवार, दि. १३ ऑगस्ट २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 290 ● Tuesday, 13 August 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-




# अण्णा भाऊ साठे यांना 'भारतरत्न' मिळावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'अण्णा भाऊ साठे यांना 'भारतरत्न' मिळायलाच हवा. त्यांना हा सन्मान मिळाल्याने या सन्मानाची प्रतिष्ठा वाढेल,' असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोमवारी केले. 'हा सन्मान मिळावा, यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करू,' असे आश्वासनही त्यांनी दिले.

साहित्यिक विश्वास पाटील लिखित आणि साहित्य अकादमीतर्फे प्रकाशित 'अण्णाभाऊ- द अपहोल्डर ऑफ दलित अँड विमेन लिटरेचर' या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे, साहित्य अकादमीचे सचिव डॉ. श्रीनिवास राव, ज्येष्ठ लेखक प्रा. रतनलाल सोनग्रा, विश्वास पाटील, कामगार सुरक्षा दलाचे संस्थापक भगवान वैराट आदी उपस्थित होते.

तावडे म्हणाले, 'या पुस्तकातून अण्णा भाऊ साठे यांचे सम्यक दर्शन समाजाला होईल. अन्य प्रादेशिक भाषांमध्ये याचा अनुवाद व्हावा, यासाठी 0पूर्ण प्रयत्न करेन.'

'हे पुस्तक साहित्य अकादमीने सर्व प्रादेशिक भाषांमध्ये प्रसिद्ध करावे. त्यातून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य देशभर पोहोचेल आणि फुले-शाहू-आंबेडकर यांचा महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जाईल. आज अण्णाभाऊ यांचा जसा सन्मान होत आहे, तसा त्यांच्या हयातीत केला असता तर ते कम्युनिस्ट पक्षाचे आंतरराष्ट्रीय नेते झाले असते,' असे मत डॉ. कसबे यांनी व्यक्त केले.

'मराठी साहित्य वर्तुळाने अण्णा भाऊ साठे यांना साहित्यिक मानले नाही. मराठी समीक्षकांना त्यांचे वावडे होते. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी त्यांचा कधीही विचार झाला नाही,' अशी खंत विश्वास पाटील यांनी व्यक्त केली.

### 'आवर्जून कार्यक्रमाला आलो'

'या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले, तेव्हा शरद पवारदेखील कार्यक्रमाला येणार असल्याचे कळले. पवार एखादा झोत टाकतात, त्याचा परिणाम कुठे आहे, हे शोधण्यातच सगळ्यांचा वेळ जातो. त्यामुळे यायचे की नाही, असा प्रश्न माझ्यापुढे होता,' असे विनोद तावडे म्हणताच हशा पिकला. 'मी विरोधी पक्षनेता असताना विलासराव देशमुख, पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर सडेतोड टीका करत असे. पण त्यानंतर आम्ही एकत्र भोजन करत असू. तसे वातावरण आज पाहायला मिळेल का, ते वातावरण कायम राहावे, म्हणून या कार्यक्रमाला आवर्जून आलो,' असे तावडे यांनी सांगितले.









# मराठ्यांची शौर्यगाथा - राक्षसभुवन लढाई

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील मराठ्यांमध्ये स्वदेश, स्वधर्म आणि स्वराज्याचा विचार पेटवला. याच विचारातून महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्य उभे राहिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातील मराठ्यांनी कटकपासून अटकेपर्यंत भगवे झेंडे फडकवले. मराठ्यांचा भगवा अटकेपार झाला. संपूर्ण हिंदुस्तान मराठ्यांच्या अधिपत्याखाली आला. कालांतराने पानिपतावर मराठ्यांची एक पिढी खर्च झाली. यामुळे मराठी साम्राज्याचा प्रभाव कमी होईल असे मुघलांना वाटू लागले. मात्र संपूर्ण हिंदुस्थानचे राज्यकर्ते फक्त मराठेच आहेत हे रणमर्द मराठ्यांनी अवघ्या काही दिवसांमध्येच सिद्ध करून दाखवले. पानिपतनंतर अनेक लढाया मराठ्यांनी गाजवल्या आणि विजयश्री खेचून आणली .यातील एक लढाई म्हणजे बीड जिल्ह्यातील 'राक्षसभुवनची लढाई' होय.

थोरले माधवराव पेशवे यांना छत्रपतींकडून सन 1761 साली पेशवेपदाची वस्त्रे मिळाली. त्यांनी 11 वर्ष 4 महिने पेशवाईचा कारभार केला. थोरले माधवराव पेशव्यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक अंतर्गत व बाह्य संकटांना तोंड दिले. नानासाहेब पेशवे स्वर्गवासी झाल्यावर मराठी राज्याचा भार रघुनाथराव दादा यांच्या खांद्यावर आला. मराठी राज्याचा उत्कर्ष व शौर्याची उज्वल परंपरा राखण्याची जबाबदारी रघुनाथराव दादावर येऊन पडली. रघुनाथराव दादा कर्तबगार होते मात्र पेशवेपदाची महत्त्वकांक्षा त्यांनी मनी बाळगली होती. याच महत्वकांक्षेमुळे राघोबादादा आणि थोरले माधवराव पेशवे यांच्यामध्ये सत्ता संघर्षही निर्माण झाला होता.

**थोरले माधवराव पेशवे व रघुनाथराव दादासाहेब मतभेद:**

थोरले माधवराव पेशवे पेशवाईच्या गादीवर विराजमान झाले त्यावेळी मराठा साम्राज्यासमोर अनेक संकटे आ वासून उभे होते. मराठ्यांजवळ पैसा नव्हता, शेजारच्या शत्रूंनी उचल खाल्ली होती आणि अनेक अनुभवी योद्धे पानिपतवर गारद झाले होते. यातच रघुनाथराव दादा आणि थोरले माधवराव पेशवे यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाल्यामुळे हैदराबादच्या निजामाने व म्हैसूरच्या हैदर अलीने संधि शोधली. पेशवे दरबारातील दुहीची माहिती निजामास समजल्याने निजाम प्रचंड मोठी फौज घेऊन पुण्यावर चालून आला. उरुळी, पाटस येथे निजामाने प्रचंड जाळपोळ लुटालुट केली. तेव्हा मराठ्यांनी निजामाला गराडा घालून सर्व बाजूने जर्जर करून सोडले. निजामाचा शेवट होणार होता. मात्र रघुनाथराव दादासाहेबांनी निजामास सवलती देऊन तह केला. त्यामुळे रघुनाथराव आणि थोरले माधवराव पेशवे असे दोन गट पेशवाई मध्ये पडले.

**मराठ्यांमध्ये फुट:**

कालांतराने थोरले माधवराव पेशवे आणि रघुनाथराव दादासाहेब या दोन गटांमध्ये घोडनदी, काळेगाव व इतर ठिकाणी काही लढाया झाला. या उलथापालथीमुळे अनेक मराठा सरदारांमध्ये असंतोष निर्माण झाला. दादासाहेबांच्या वागणुकीमुळे नाराज झालेले अनेक सरदार निजामास जाऊन मिळाले. निजामाने या सरदारांना आपल्या राज्यात जहागिरी व इनामे देऊन त्यांचा सन्मान केला. आपली शक्ति वाढल्याचे समजून पुन्हा एकदा निजाम पुण्याच्या रोखाने चालून आला. निजामाने पुणे जाळले. सातारा छत्रपतींच्या गादीपासून खंडणी वसूल केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून रघुनाथराव दादासाहेबांनी निजामाचे भागानगर येथे धडक दिली व भागानगर जाळले.

**मल्हारराव होळकरांची मध्यस्ती:**

सन 1763 च्या सुरुवातीला बहुतेक सर्व मराठा सरदार निजामास जाऊन मिळाले होते. निजामाचे पारडे जड झाले होते. त्यामुळे निजामाकडे पायदळ, तोफखाना प्रचंड मोठ्या प्रमाणात जमा झाला. त्याची ताकद खूपच वाढली. त्यामुळे निजामाशी समोरासमोर युद्ध करणे ठीक नाही हे पुणे दरबाराने ओळखले. गनिमी कावा करून निजामाचा पुरता समाचार घेण्याचे ठरले. यावेळी मल्हारराव होळकर यांनी मराठशाहीमध्ये पडलेली फुट भरून काढण्याचे काम केले. निजामाचे यश हे आपल्या फुटीवर अवलंबून आहे हे मराठा सरदारांना समजावून सांगितले. मल्हारराव होळकरांनी जानोजी भोसले, भगवानराव प्रतिनिधी, पिराजी नाईक निंबाळकर, घारगुडे यासह अनेक सरदारांना समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या. त्यांना पुन्हा मराठा साम्राज्याच्या सेवेसाठी रुजू करून घेतले. सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रयत्नामुळे निजामास जाऊन मिळालेल्या अनेक सरदार पुन्हा माघारी आले. निजामाचे सैन्य पुन्हा एकदा मराठी मुलुखावर चालून आले होते. यावेळी निजामास मिळालेले सरदार पुन्हा मराठेशाहीस मिळाल्याने मराठा सरदार एकत्र झाले. त्यांनी निजामाचा बिमोड करण्याचे ठरविले. मराठे निजामावर चालून जाऊन निजामास जशास तसे उत्तर द्यायचे नियोजन करीत होते.

**लढाईची मोर्चेबांधणी:**

पावसाळ्याचे दिवस सुरु झाल्याने मराठा आणि निजाम आपापल्या छावणीच्या विस्तारास लागले. दि. 5 ऑगस्ट 1763 नंतर मराठ्यांच्या फौजा बीड परिसरात दाखल झाल्या. तर निजाम शहागड जवळून गंगा पार करणार होता. यावेळी गोदावरीला प्रचंड पाणी असल्याने त्याला हा विचार प्रत्यक्ष उतरवण्यात अडचण येऊ लागली. दरम्यान 9 ऑगस्ट रोजी मराठ्यांच्या फौजा माजलगाव परिसरात मुक्कामास होत्या. त्यांना निजामाचे मुख्य लष्कर राक्षसभुवन येथे असल्याचे समजले आणि त्यांनी राक्षसभूवनाकडे आगेकूच केली. दि. 10 ऑगस्ट रोजी मराठ्यांची संयुक्त फौज राक्षसभुवन येथे दाखल होऊन निजामाच्या समोर उभी ठाकली.

**प्रत्यक्ष लढाईस सुरुवात:**

निजाम गोदावरीच्या पैलतीरावर तर अलीकडे निजामाचे वरकड कुलसरदार होते. दि. 10 ऑगस्ट 1763 रोजी मराठ्यांनी राक्षसभूवनाच्या भूमीवर 'हर हर महादेव' गर्जना करून निजाम सैन्यावर तलवारी उपसल्या. मराठ्यांची आघाडी पुरंदरे आणि हुजूर पागेचे सरदार सांभाळत होते. सुरुवातीला मराठ्यांच्या आघाडीवर निजाम फौजेने जोरदार तोफांचा मारा सुरु केला. तोफांचा मारा करीत असतानाच निजामाच्या लष्करातील दारुखान्यास आग लागली. त्यामुळे निजाम फौजेत काहीसा गोंधळ माजला. या गोंधळाचा फायदा पुरंदरे आणि विंचूरकर यांनी घेऊन निजाम फौजेवर त्वेषाने हल्ला चढविला. निजामाची आघाडीची फौज उधळून लावून निजाम फौजेमध्ये मराठ्यांनी प्रवेश मिळविला. निजामाची आघाडीची फळी तुटल्याने रघुनाथराव दादासाहेब सैन्य घेऊन निजाम फौजेमध्ये घुसले. त्यांनी मोठ्या निकराने युद्ध मांडले. शत्रूंची लांडगेतोड सुरु केली.

# विविध कार्यक्रमांनी आदिवासी दिन साजरा

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरूनगर एसटी आगारात जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

एसटी आगारात दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. वीर राघोजी भांगरे, बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, बाबाजी काळे, राजगुरुनगर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक सुनील आढारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विठ्ठल वनघरे, समीर भोमाळे, सुधीर मुंगसे, हिरामण सातकर उपस्थित होते.






यावेळी बोलताना अतुल देशमुख म्हणाले, 'आदिवासी हा जल, जंगल, जमीन यांचे रक्षण करणारा आजही दऱ्याखोऱ्यात-कड्याकपाऱ्यात राहुन आपल्या जमिनीची मशागत करून जीवन जगत आहे. अतिशय काबाडकष्ट करणारे परंतु प्रामाणिकपणे काम करणारे व माणुसकीचा धर्म पाळणारे असा हा आदिवासी समाज विज्ञान युगात अध्यात्म मार्ग स्वीकारत उत्तम शिक्षण घेऊन नोकरी निमित्ताने उच्च पदावर कार्यरत आहेत ही कौतुकास्पद बाब आहे.

यावेळी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांची बसस्थानकावर काढलेली रांगोळी आदिवासी दिनाच्या निमित्ताने आकर्षक ठरली. कार्यक्रमासाठी आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, स्थानकप्रमुख तुकाराम पवळे, दिलीप तापकीर, प्रशांत होले, वैभव सावंत, अजिंक्य फलके , कार्यशाळा कर्मचारी जालिंदर पोटे, सोमनाथ काळे, स्नेहा कातोरे, रोहीणी साबळे, पुष्पा चासकर, साक्षी बिराजदार, मनिषा सुतार रुपाली मरभळ , वाहतूक नियंत्रक गुलाब तिटकारे, नागेश्वर वैरागर, संभाजी शिंदे, प्रशांत दौंडकर, कैलास झांजरे, बाळासाहेब लोहोकरे, भारत सुरपाम, सेवानिवृत्त कर्मचारी दिलीप तापकीर उपस्थित होते. सुत्रसंचलन दत्तात्रय गभाले यांनी केले तर आभार सेवानिवृत्त कर्मचारी दिलीप चौधरी यांनी मानले.

# सोनालिकाने चार महिन्यात 50 हजार ट्रॅक्टर विक्रीचा ओलांडला टप्पा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताचा क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका आपल्या इंधन कार्यक्षम हेवी ड्युटी ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अपरिमित आनंद आणि असाधारण समाधान देण्यासाठी ओळखली जाते. आर्थिक वर्ष 2025 च्या दुसऱ्या तिमाहीच्या सुरुवातीला 'भारताचा अभिमान' असलेल्या सोनालीका ट्रॅक्टर्सने आर्थिक वर्ष 2025 च्या केवळ चार महिन्यात एकंदर 50 हजार ट्रॅक्टर विक्रीचा टप्पा ओलांडून नवा टप्पा गाठला आहे. कंपनीने एप्रिल ते जुलै 2024 या दरम्यान वार्षिक 51,268 ट्रॅक्टर विक्रीची नोंद केली आहे. आपली दमदार वाढ साध्य करत असताना कंपनीने देशांतर्गत बाजारपेठेची कामगिरी मागे टाकली असून देशांतर्गत बाजारपेठेत अधिक वाटा काबीज करणाऱ्या आघाडीच्या कंपनीपैकी ती एक ठरली आहे. येत्या काही महिन्यात येणार असलेल्या सणांच्या सर्वात मोठ्या हंगामासाठी ट्रॅक्टर उद्योग तयार होत असताना या कामगिरीमुळे ब्रँडसाठी नवी दिशासुद्धा मिळाली आहे.



# थोडक्यात




## भगवा सप्ताह व स्वातंत्र्य दिन निम्मित रक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) :** खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून भगवा सप्ताह आयोजित केला जात आहे. याची औचित्य साधून व देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.हवेली तालुका माजी प्रमुख संदीप मते पाटील यांनी माहिती दिली. खडकवासला येथील संपर्क कार्यालयामध्ये सकाळी 9 ते 4 यावेळेमध्ये रक्तदान शिबिर होणार आहे. मतदारसंघातील शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन संदीप मते पाटील यांनी केले आहे.

## उत्सुकता सनी लिओनीची 'कोटेशन गँग' ची !

**पुणे (आरंभ पर्व) :** सनी लिओनी स्टारर 'कोटेशन गँग' 30 ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होण्याच्या तयारीत असल्याने चाहत्यांना या बद्दल उत्सुकता आहे. हा बहुप्रतिक्षित चित्रपट सनी ची एक वेगळी बाजू दाखवणार यात शंका नाही. सनी लिओनी च्या कामगिरीची वाट पाहत असताना प्रेक्षकांनी लिहिलं "सनी फक्त अभिनय करत नाही ती फक्त त्या व्यक्तिरेखेत जगत आहे " 'कोटेशन गँग'सारखी भूमिका निवडल्याबद्दल अनेकांनी सनीचे कौतुक केले.




## अप्सरा आईस्क्रीम 53व्या वर्धापनदिनानिमित्त राबविणार 'मुस्कान' उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई येथील देशातील एक सुस्थापित आणि विश्वासप्राप्त ब्रँड असलेल्या अप्सरा आईस्क्रीमने कंपनीच्या 53व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज एका नावीन्यपूर्ण उपक्रमाची घोषणा केली. लोकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि स्मितहास्य आणण्यासाठी कंपनी 53,000 मोफत आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.'मुस्कान' हा उपक्रम 78 व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 15 ऑगस्टपासून मुंबई व पुण्यात सुरु होणार आहे. त्यानंतर अन्य शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने तो सुरु करण्यात येणार आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, या उपक्रमांतर्गत कंपनी 53,000 आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.हे सुमारे चार टन आईस्क्रीम आहे.

# राक्षेवाडी ग्रामपंचायतकडून दिव्यांगांना धनादेश वाटप

**खेड (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील राक्षेवाडी ग्रामपंचायतीने राखीव पाच टक्के अपंग कल्याण निधीतून गावातील दिव्यांगांना धनादेशाचे वाटप केले.धनादेश हातात मिळताच दिव्यांगांनी आनंद व्यक्त करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलल्याचे पाहायला मिळाले. राक्षेवाडी ग्रामपंचायत दरवर्षी गावच्या हद्दीत राहणाऱ्या आणि अपंगाचे प्रमाणपत्र असलेल्या दिव्यांगांना ग्रामपंचायत उत्पन्नाच्या पाच टक्के अपंग राखीव निधीतून धनादेश वाटप करीत आहे. यावर्षी 23 दिव्यांगांना प्रत्येकी 5 हजार एकशे अडूसूष्ठ रुपयेचा धनादेश वाटप करण्यात आला.



दरवर्षी न चुकता ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व प्रशासन दिव्यांग व्यक्तींना आर्थिक मदत करीत आहे.धनादेश मिळाल्याने उपस्थित दिव्यांगानी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.दिव्यांग व्यक्तींनी स्वतःसाठी पैसे खर्च करण्याचे आवाहन ग्रामपंचायतीचे सरपंच,उपसरपंच व सदस्यांनी यावेळी केले. धनादेश वाटप प्रसंगी बाजार समितीचे संचालक व ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य अशोकदादा राक्षे,सरपंच सविता राक्षे, उपसरपंच रविराज राक्षे,ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच सुरेखा राक्षे,मच्छिन्द्र राक्षे,जितेंद्र सांडभोर,श्रद्धा सांडभोर,वैजयंता थिटे,चांगुणा थिटे,ग्रामसेवक सारिका कडूसकर,पोलीसपाटील पप्पूकाका राक्षे,माजी उपसरपंच बाबुराव राक्षे व जिप शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

# म्युझिगल पुण्यातील बिबवेवाडी येथे त्यांची संगीत अकादमी सुरु केली

- म्युझिगलने पुण्यात चौथी अकादमी सुरू केली
- म्युझिगल संघटित संगीत शिक्षण उद्योगात एक प्रमुख खेळाडू म्हणून स्वत:ला प्रस्थापित करत आहे, त्याची पोहोच वाढवत आहे आणि चांगला प्रभाव पाडत आहे




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

म्युझिगल, भारतातील सर्वात मोठे संगीत शिक्षण व्यासपीठ, पुण्यातील बिबवेवाडी, पुणे परिसरात असलेल्या चौथ्या संगीत अकादमीच्या भव्य शुभारंभाची अभिमानाने घोषणा करते. 1500 sqft मध्ये पसरलेली, नवीन अकादमी गायन आणि वाद्य संगीत दोन्ही शिक्षणासाठी अतुलनीय शिक्षण वातावरण देते. उद्घाटन सोहळ्याचे उद्घाटन गायक रोहित श्याम राऊत (प्ले बॅक सिंगर, इंडियन आयडॉल फायनलिस्ट, सोनी टेलिव्हिजन आणि सा रे ग मा पा लिटल चॅम्प्सचे फायनलिस्ट), प्रमुख पाहुणे म्हणून उदीक्ष सूद (व्हीपी मुझिगल एज्युटेक प्रायव्हेट लिमिटेड) यांनी केले. सन्माननीय पाहुणे.

2020 मध्ये त्याच्या स्थापनेपासून, मुझिगलने संघटित संगीत शिक्षण उद्योगात एक प्रबळ शक्ती म्हणून वेगाने स्वतःची स्थापना केली आहे. भारतभरात 60 पेक्षा जास्त अकादमी आणि 2025 पर्यंत 100 पेक्षा जास्त अकादमींचे उद्दिष्ट असलेले, मुझिगल संगीत शिक्षण कसे दिले जाते ते पुन्हा परिभाषित करत आहे. बालेवाडी-बाणेर अकादमी ही अनेक बॅचमध्ये 500 हून अधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्याची क्षमता असलेल्या उच्च-स्तरीय संगीत शिक्षण सुविधा प्रदान करण्याच्या मुझिगलच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. मुझिगल अकादमी पियानो, कीबोर्ड, गिटार, ड्रम्स, कर्नाटकी वोकल्स, हिंदुस्थानी गायन, वेस्टर्न वोकल्स, व्हायोलिन आणि उकुले यासह सर्वसमावेशक अभ्यासक्रम उपलब्ध करते. Muzigal संगीत शिकणे आणि शिकवण्यासाठी एक 360-डिग्री फ्रेमवर्क प्रदान करते, ऑनलाइन, ऑफलाइन आणि संगीत इन्स्ट्रुमेंट रिटेल एका एकसंध प्लॅटफॉर्ममध्ये एकत्रित करते. उद्घाटन महिन्यासाठी, Muzigal सर्व नावनोंदणीसह एक महिन्याचे मोफत संगीत शिक्षण देत आहे, संगीत शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या ध्येयावर भर देत आहे. लाँच इव्हेंटमध्ये, डॉ. लक्ष्मीनारायण येलुरी यांनी संगीत शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याच्या मुझिगलच्या ध्येयावर प्रकाश टाकला: "मुझिगल अकादमी शिकणाऱ्यांना त्यांच्या समुदायातील अत्याधुनिक शिक्षण केंद्रात प्रवेश प्रदान करून आमच्या ध्येयावर आधारित आहे. ही अकादमी सर्वोत्तम शिक्षण देते. आणि तज्ज्ञ शिक्षकांद्वारे शिकविले जाणारे भारतीय शास्त्रीय आणि पाश्चात्य संगीतातील विस्तृत अभ्यासक्रमांसाठी संगीत शिकवण्याचा अनुभव."

मुझिगलचा संरचित अभ्यासक्रम, नियतकालिक मूल्यमापन, प्रमाणन, लवचिक शुल्क भरणा योजना आणि उच्च प्रशिक्षित शिक्षक शिकाऊ-केंद्रित दृष्टिकोन सुनिश्चित करतात. अकादमीचे वातावरण आणि पायाभूत सुविधा संगीताच्या प्रतिभेला प्रेरणा देण्यासाठी आणि त्यांचे संगोपन करण्यासाठी डिझाइन केल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या संगीत प्रवासासाठी एक स्पष्ट आणि तयार केलेला रोडमॅप मिळेल.दर्जेदार संगीत शिक्षण व्यापकपणे प्रवेशयोग्य बनवण्याच्या त्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब. "संगीत योग्य मार्गाने शिका" ही टॅगलाइन संगीत शिक्षणासाठी एक संरचित आणि उद्देशपूर्ण दृष्टीकोन प्रदान करण्याच्या मुझिगलच्या समर्पणाचा अंतर्भाव करते, हे ओळखून की प्रत्येक विद्यार्थी अद्वितीय आहे आणि त्याला वैयक्तिकृत शिक्षण मार्ग आवश्यक आहे.

मुझिगलचा अभ्यासक्रम केवळ संगीत प्रवीणता विकसित करण्यासाठीच नाही तर संज्ञानात्मक क्षमता आणि जीवन कौशल्ये वाढवण्यासाठी देखील तयार करण्यात आला आहे. मुझिगल येथील संगीत शिक्षण स्मरणशक्ती, मोटर समन्वय आणि आकलन कौशल्ये सुधारते, तसेच जबाबदारी, शिस्त आणि चिकाटी यासारखे गुण वाढवते. मुझिगलचा असा विश्वास आहे की खरे संगीत शिक्षण चांगल्या गोलाकार व्यक्तींचे पालनपोषण करते जे वास्तविक-जगातील आव्हानांना आत्मविश्वासाने नेव्हिगेट करू शकतात.



- खडकवासला मतदारसंघातील शिवस्वराज्य यात्रेला प्रचंड प्रतिसाद

# खडकवासल्याचा आमदार महाविकास आघाडीचाच

## एक दिलाने सर्वांनी कामाला लागा : प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांचे कार्यकर्त्यांना आवाहन





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सत्ताधाऱ्यांना आता जनता कंटाळली असून आगामी काळामध्ये महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे. खडकवासल्यातून महाविकास आघाडीचाच आमदार होणार त्यासाठी सर्वांनी एक दिलाने कामाला लागा. असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी केले. शिवस्वराज्य यात्रेतील दिवसाची सांगता सभा खडकवासला विधानसभा मतदारसंघातील नवले लॉन्स नऱ्हे येथे झाली. यावेळी ते बोलत होते .

यावेळी व्यासपीठावर खा. सुप्रिया सुळे खा .अमोल कोल्हे, प्रदेश युवक अध्यक्ष मेहबूब शेख, पुणे जिल्हा अध्यक्ष जगन्नाथ बापू शेवाळे, पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, माजी आमदार कुमारभाऊ गोसावी, महादेव कोंढरे, खडकवासला विधानसभा अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, भारती शेवाळे, स्वाती पोकळे, सचिन दोडके, बाळाभाऊ धनकवडे, विशाल तांबे, नवनाथ पारगे, अनिता इंगळे, संतोष चाकणकर, दिपक बेलदरे, किशोर कांबळे, राजश्री पाटील, पुजा परगे, आश्विनी कदम, प्रकाश म्हस्के यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी 'वग महाराष्ट्राचा' हे रामानंद उगले यांचे वगनाट्य सादर करण्यात आले. यामधून महायुती सरकारवर ताशेरे ओढण्यात आले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. काकासाहेब चव्हाण यांनी करताना खडकवासला विधानसभा मतदारसंघातील समस्या मांडताना विद्यमान आमदारांवर टीका केली. येथील समाविष्ट गावात वाढीव टॅक्स बाबतीत त्रास होत असताना कोणतीही ठोस उपाययोजना नाही. समाविष्ट गावांमध्ये रस्त्यावर ड्रेनेज रस्त्यावर वाहत आहे. यावर आमदारांनी आवाज उठवला नाही. लोकप्रतिनिधी बदलण्याची हीच योग्य वेळ आहे. असे मत मांडले.

माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे यांनी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेससाठी ही चांगली संधी असल्याचे मत व्यक्त केले. खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये व सरकारमध्ये भाजप सत्तेमध्ये होती. त्यावेळी ह्या भागात कोणतीही ठोस कामे केले नाही.त्यामुळं आमदार हा आपलाच असणार आहे असा विश्वास व्यक्त त्यांनी केला.

यावेळी माजी आमदार कुमार गोसावी यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये शाहू फुले आंबेडकरांचे विचार घरोघरी पोहोचवले पाहिजे हा विचार व्यक्त केला.

पुढे बोलताना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील लोकसभेला मित्र पक्षासाठी आपण जागा कमी केल्या. मात्र सर्वात जास्त स्ट्राईकने आपण विजय झालो.

एकेकाळी स्वतःला मोदी सरकार म्हणून बोलवून घेणारे लोक आता एनडीए सरकार म्हणू लागले ही त्यांची नाचक्की आहे. फक्त तीन महिने लाडकी बहीण योजना चालेल .

46 हजार कोटीचे नियोजन सरकारकडे नाही. त्यामुळे ते सांगत फिरत आहेत की आमचं सरकार नाही आले कीं पैसे मिळणार नाहीत.पण

कोणत्याही धोरणात्मक अभ्यास शिवाय केलेल्या या योजना आम्ही भविष्यात चांगल्या पद्धतीने राबवण्याचा प्रयत्न करणार आहोत.

महाराष्ट्राचा मूड बदललेला आहे. जनतेने सत्ता परिवर्तनाचा निर्णय घेतला आहे. आगामी काळामध्ये परिवर्तन हे होणारच आहे.

खडकवासला मतदारसंघातील उमेदवारीबाबत बोलताना त्यांनी जागावाटप संदर्भात घटकपक्षांसोबत बैठक झाल्यानंतर इच्छुक व आपण एकत्रित बसून मेरिटवर निर्णय घेऊन उमेदवार ठरवू असेही पाटील यांनी सांगितले. खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काका चव्हाण यांच्या कामाचे कौतुक केले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवारचे अध्यक्ष मेहबूब शेख यांनी सरकारंवर टीका केली .

सरकारचे सगळे प्रकल्प गुजरातला नेण्याचे काम सुरु आहे. ही गद्दार टोळी महाराष्ट्र लुटत आहेत आपण फक्त हे पाहू शकतो यासाठी राज्यात परिवर्तन करण्याची गरज आहे.

जातीजातीमध्ये भांडणे लावून भारतीय जनता पार्टी राजकारण करत आहे.मंदिर मशिद करण्यापेक्षा रोजगार आणि विकास करायला हवा त्यासाठी परिवर्तन गरजेचे आहे.

खासदार अमोल कोल्हे यांनी आपले मतं मांडले. महाराष्ट्रातील सरकारला व महायुतीच्या नेत्यांना लोकसभेप्रमाणे जागा दाखवून द्या. पुण्यामधील वाहतूक कोंडीने सर्व नागरिकांना हैराण केले आहे.पुण्यामध्ये एकता नगरी मध्ये प्रचंड पूर आला.

लाडकी बहीण लाडका भाऊ प्रमाणेच लाडका बिल्डर योजना या सरकारने कार्यान्वित केले की काय असा संशय येतोय.

पंधरा लाख देणारे पंधराशे रुपये देऊन खुश करत आहेत .सगळ्या वस्तूवर जीएसटी लावत आहेत.हे सर्व तुमच्या आमच्या पैशातून जात आहे.

कोणत्याही आमिषाला बळी पडू नका. सिंहगडाची भूमी तुमची संघर्षाची आहे. हा वारसा जतन करून आगामी विधानसभेमध्ये आपला आमदार करा. "

खासदार सुप्रिया सुळे यांनी बोलताना मतदारसंघातील जनतेचे आभार मानले की आपण मला लोकसभेवर निवडून दिले. लोकसभेला जात असताना आम्ही आत्मविश्वास गमावलं होतो. पक्ष चोरला तरीही कार्यकर्त्यांच्या जीवावर आठ खासदार निवडून आले. या भागामध्ये आपली मोठी ताकद आहे. आपल्या भागातील सर्वच नगरसेवक जिल्हा परिषद सदस्यांचे काम चांगले आहे. जागा एक आहे इच्छुक अनेक आहेत . यावेळी मिरीट वर घटक पक्ष व सर्वांशी चर्चा करून निर्णय घेऊ या.

" राम कृष्ण हरी वाजवा तुतारी "हा स्लोगन काका चव्हाण यांनी दिला असल्याचं सांगितलं.. सर्वांनी एकीने प्रामाणिकपणे खडकवासल्याचा आमदार करण्यासाठी प्रयत्न करा मी तुमच्या पाठीशी असल्याचे सांगितले. आभार प्रदर्शन ग्रामीणचे अध्यक्ष त्रिंबक मोकाशी यांनी केले.









## थोडक्यात




### शिवराज्य समूहाच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) :** देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून शिवराज्य समूह व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे यांच्यावतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. 15 ऑगस्ट 2024 रोजी महाराजा पॅलेस गोकुळनगर नऱ्हे येथे सकाळी 8 ते 6 यावेळेत भव्य रक्तदान शिबिर होणार आहे. सर्व देशप्रेमी नागरिकांनी उस्फूर्तपणे रक्तदान करावे. रक्तदात्यांनी 9822412540 8120200505 ह्यां नंबर वर संपर्क साधून नावे नोंदवावीत. देश प्रेमाच्या ह्यां अभिनव चळवळीत योगदान द्यावे असे आवाहन आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला विधानसभा कार्याध्यक्ष भुपेंद्र मोरे यांनी केले आहे. गतवर्षीही स्वातंत्र्य दिनाचे निमित्त त्यांनी एक हजार लिटर रक्त संकलित केले होते. ह्यां शिबिरातून गरजू पेशंटना रक्तपिशव्या देण्याचं कामही ते करतं आहेत. सामाजिक व चळवळीत मोरे हे गेले अनेक वर्षापासून या भागामध्ये कार्य करत आहेत.

# प्रा. वसंत हंकारे यांच्या समाज प्रबोधनाने सर्वजण भारावले

## न्यू आर्या फाउंडेशनचे सामाजिक प्रबोधनात्मक व्याख्यान




**पुणे लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

मुलं मोठी झाल्यावर आई बापासाठी असे पर्यंत मुलांना वेळ नसतो. परंतु मृत्यूनंतर स्मृती निमित्त दोन दोन दिवस वेळ असतो. मुलांनी हाच वेळ मृत्यू अगोदर दिल्यास आई बापांचे म्हातारपण सुखकर जाईल असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक वसंत हंकारे यांनी व्यक्त केले. न्यू आर्या फाऊंडेशनच्या वतीने प्रा.वसंत हंकारे यांच्या ' बाप समजून घेताना' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष कदम, माजी नगरसेवक हरिश्चंद्रआण्णा दांगट, अतुल चाकणकर, सुहासबापू चाकणकर, ॲड. नितीन कदम, व्यासपीठावर उपस्थित होते.

जीवन जगत असताना समाजात अनेक प्रलोभन मुलांना यशापासून दूर खेचत असतात. मुलं आई वडील रागावतील म्हणून आई-वडिलांना काही सांगत नाहीत. अशा प्रसंगातून मुल आणि आई-वडिलांमधील अंतर थोडे थोडे करत वाढत जाते आणि संवाद बंद होतो. असे स्पष्ट करून प्राध्यापक हंकारे यांनी सांगितले की, मुलांना आई-वडिलांपेक्षा खुशामत करणाऱ्या व्यक्तीच खऱ्या वाटू लागतात. अशा व्यक्तींची मुलांशी जवळीक वाढते. पुढे अचानक अशा व्यक्तींपासून मुलांची फसवणूक होण्याची शक्यता दाट असते. असे झाल्यास मुलांना असुरक्षित वाटते.

आई बाप जन्मापासून मुलांची काळजी घेत असतात. परंतु मुलं मोठी झाल्यावर आई बापाचे हे कष्ट विसरतात म्हातारपणात गरजेला मुलांना वेळ नसतो असे होऊ नये यासाठी मुलांनी आपले आईबापाने आपल्यासाठी काय कष्ट घेतले याची जाणीव ठेवली पाहिजे. आई-वडिलांशी छोटे छोटे कोणत्याही समस्या असतील तर संवादातून चर्चा केली तरच मार्ग निघून जीवनाची यशस्वी वाटचाल होईल, हे समजून सांगताना प्राध्यापक हंकारे यांनी समाजातील अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. ते म्हणाले आपले संस्कार हीच आपली शिदोरी असते यातूनच आपण घडत जातो. मुलांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनाच्या आहारी जाऊ नये यासाठी प्रयत्नपूर्वक काम झाले पाहिजे तसेच मुलींवर होणारे अत्याचारांविरोधात मुलींनी मोठ्या हिमतीने लढले पाहिजे तरच समाजात अपप्रवृत्ती बोकाळणार नाहीत. यासाठी आई-बापांबरोबरचा संवाद असणे हेच महत्त्वाचे आहे. व्यंकटसाई होंडा तर्फे या कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले होते.



## 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024' पुरस्कार सोहळ्याची घोषणा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'मराठी कलांचा, गुणांचा प्रतिभा प्रशंसा सोहळा...' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024' पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली आहे. मागच्या वर्षाप्रमाणे यंदाही हा पुरस्कार सोहळा भव्य-दिव्य स्वरूपात संपन्न होणार आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने मराठी नाटक-चित्रपट क्षेत्रातील अभिनेते-अभिनेत्री-तंत्रज्ञ एकत्र येणार आहेत. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024' मध्ये सहभागी होण्याकरीता नाटक-चित्रपट निर्मात्यांना प्रवेश अर्ज भरून आपल्या कलाकृतीची एन्ट्री पाठवता येईल. सध्या पुण्यातून विविध क्षेत्रात 'आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज्' आपला विस्तार करीत आहे. आर्यन्स ग्रुप ऑटोमोबाईल, पेट्रोकेमिकल्स, सोलर पॉवर, गोल्ड रिफायनरी, हॉस्पिटॅलिटी, ग्रीन एनर्जी, एव्हिएशन, फार्मास्युटिकल्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फायनान्स आणि ॲग्रिकल्चर अशा विविध क्षेत्रात कार्यरत आहे. पुण्यामधून आर्यन्स ग्रुप लवकरच मराठी वृत्तवाहिनी, मनोरंजन वाहिनी, क्रीडा वाहिनी आणि ओटीटी प्लॅटफॉर्मद्वारे मिडीया आणि मनोरंजनाच्या क्षेत्रात पदार्पण करीत आहे. यामुळे पुणे परिसरातील कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते यांनाही आर्यन्स परिवारात सामावून घेता येणार आहे. 'आर्यन्स ग्रुप ऑफ कंपनीज'च्या माध्यमातून विविध स्तरांवर वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. मनोरंजन विश्वातील सिनेमा-नाटक आणि मराठी कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मागील वर्षापासून आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक पुरस्कार सोहळ्याची सुरुवात करण्यात आली आहे. यंदाचे हे पुरस्काराचे दुसरे वर्ष आहे. इतर मोठमोठ्या पुरस्कार सोहळ्यांमध्ये विजेत्यांना केवळ ट्रॉफी दिली जाते, पण राज्य सरकारच्या पुरस्कार सोहळ्याप्रमाणे 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024'मध्येही विजेत्यांचा रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे. आर्यन्स ग्रुप च्या उत्तम नियोजनामुळे मागच्या वर्षी हा पुरस्कार सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला होता. या वर्षीही आर्यन्सची टिम 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024' सोहळ्यासाठी सज्ज झाली आहे. 'आर्यन्स सन्मान चित्रपट-नाटक 2024' पुरस्कार सोहळ्यामध्ये एकूण 22 विभागांमध्ये मराठी चित्रपटांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. नाट्य विभागात 16 पुरस्कार दिले जातात. यंदा काही विभाग वाढवण्यात आले असून, पुरस्कारांची एकूण रक्कम 12.50 लाख रुपये करण्यात आली आहे.

- राज्य सरकारनंतर रोख पुरस्कार देणारा दुसरा पुरस्कार सोहळा

९ ऑक्टोबर रोजी एका दिमाखदार नॉमिनेशन पार्टीमध्ये नामांकने घोषित करण्यात येतील आणि त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात देखण्या पुरस्कार सोहळयात विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या सोहळयाला मराठी सिने व नाट्य विश्वातील तारे-तारकांची मांदियाळी अवतरणार आहे. दिनांक १ जून २०२३ ते दिनांक ३१ मे २०२४ या कालावधीत प्रदर्शित किंवा सेन्सॉर झालेल्या मराठी व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटकांना तसेच चित्रपटांना पुरस्कार सोहळयात प्रवेश घेण्यासाठी अर्ज करता येणार आहे. अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली असून, १० सप्टेंबर २०२४ अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख असणार आहे. पुरस्कार सोहळयासाठी aaryanssanman.in या संकेतस्थळावर प्रवेश अर्ज उपलब्ध करण्यात आले असून, आपले प्रवेश अर्ज त्याच वेबसाईटवर अपलोड करता येतील अधिक माहितीसाठी संपर्क : ०८१४९०४६४६२.

# खडकवासला विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करण्याचा आ. भीमराव अण्णा तापकीर यांच्याकडून प्रयत्न

## भारतीय जनता युवा मोर्चा प. अध्यक्ष निखिल धावडे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या पश्चिम विभागामध्ये आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी विकास करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. अनेक वर्ष रेंगाळलेली कामे त्यांनी पूर्ण केलीत .अधिक मोठ्या पद्धतीने विकास निधी दिला आहे. त्यामुळे आगामी काळातील जनता त्यांना म्हणजेच भाजपला साथ देईल असे मत भारतीय जनता युवा मोर्चाचे पश्चिम अध्यक्ष कोंढवे धावडे चे माजी उपसरपंच निखिल धावडे यांनी व्यक्त केले.

आरंभपर्व इलेक्शन टॉक सदरामध्ये त्यांनी संवाद साधला त्यावेळी त्यांनी माहिती दिली. खडकवासला मतदारसंघांमध्ये अत्यंत जिव्हाळ्याचें प्रश्न सोडवण्यात आलेत. या भागाच्या विकासासाठी भीमराव अण्णांनी





अंदाजे शेकडो कोटी निधी दिला आहे.शिवणे ते कोंढवे धावडे रस्ता साठी 10 कोटी रुपये देण्यात आले. ह्यां रस्त्याच्या कामामध्ये अण्णांनी विरोध जुगारून अतिक्रमण हटवले.व रस्त्याचे विस्तारीकरण केलं. कुरंजाई माता ब्रिज , सुदर्शन ब्रिजचे विस्तारीकरण करण्यात आले. आज या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दळणवळण होत आहे.

ऑक्सिजन पार्क, या भागातील नागरिकांसाठी मोफत ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून दिली. कोंढवे धावडे या गावातील अनेक दुर्गम रस्त्याचे कॉंक्रिटीकरण आमदार निधीतून करण्यात आले. उपसरपंच असताना कोंडवे धावडे गावात आरोग्य शिबिरे रक्तदान शिबिरे,विविध योजनांसाठी सेवा शिबिरे घेण्यात आली.या गावाच्या प्रगतीसाठी आतापर्यंत अविरत प्रयत्न सुरू आहेत. जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते.त्यास मंत्री चंद्रकांत दादा पाटील व भीमराव अण्णा तापकीर उपस्थित होते.

खडकवासला युवा मोर्चा अध्यक्ष झाल्यापासून भारतीय जनता पार्टीमध्ये युवा संघटन करण्याचे काम सुरु आहे. अनेक युवक भारतीय जनता पार्टीशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे.निवडणुका असो नसो युवकांचे प्रश्न सोडवण्याला पहिले पूर्वीपासून आपण प्राधान्य देत आहोत. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये युवक मोठ्या संख्येने भाजपला निश्चितपणे सहकार्य करतील हा आत्मविश्वास आहे.

तळापासून वरिष्ठांपर्यंत स्नेहभाव असलेले मोजके नेते आहेत त्यापैकी एक भीमराव तापकीर आहेत.त्यांच्या नम्रपणा व संयमीपणामुळे कितीही संकटे आली तरीही न डगमगता ते सामोरे जातात.आमच्यासारख्या युवा कार्यकर्त्यांना सातत्याने मार्गदर्शन करतात ही त्यांची खासियत सर्वत्र मतदारसंघात आहे. भविष्यातील राजकारणामध्ये पक्ष देईल ते जबाबदारी झपाटून काम करण्याचं धोरण आम्ही सर्व युवा कार्यकर्ते घेतं आहोत. कॅबिनेट मंत्री चंद्रकांत दादा पाटील ,आमदार भीमराव अण्णा तापकीर, मतदार संघाचे अध्यक्ष सचिनभाऊ मोरे ,अध्यक्ष गणेश वरपे पाटील , ग्रामीण अध्यक्ष नवनाथभाऊ तागुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटनेचे काम करत आगामी विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या विजयासाठी जीवाचं रान करणार आहोत असेही निखिल धावडे यांनी शेवटी सांगितले.

### धावडे यांची वाटचाल

निखिल धावडे यांच्या कुटुंबामध्ये चुलते सुरेश दत्तात्रय धावडे सी एम ई चेअरमन होते.मात्र एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून कामाची सुरुवात केली. पुढे गावकऱ्यांनी विश्वास टाकून त्यांना ग्रामपंचायतीमध्ये सदस्य पदाची संधी दिली व गावच्या उपसरपंच पदी त्यांची निवड झाली. त्यातून पुढे भारतीय जनता पार्टीचे कार्य करत आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्यासोबत ह्यां भागाच्या विकासासाठी कार्य सुरू ठेवले.2023 साली पक्षाने खडकवासला विधानसभा मतदारसंघातील पश्चिम विभागाच्या युवा मोर्चा अध्यक्षपदी निवड केली.केंद्रीय राज्य मंत्री मा श्री मुरलीधर मोहोळ शहराध्यक्ष धीरज घाटे आमदार भीमराव आण्णा तापकीर यांच्या हस्ते निवड पत्र देण्यात आले. उत्तम नगर शिवणे कोंढवे धावडे ह्यां भागात त्यांचे चांगले कार्य आहे. युवकांमध्ये त्यांची क्रेझ आहे.हाती घ्याल ते तडीस न्याल ह्यां धोरणांनी त्यांची कार्यपद्धती सर्वांनाच भावते.



## 'युवानेता' संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होतोय

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्याचं राजकारण, समाजकारण, नागरिकांची होणारी फरफट आणि त्यातून पेटून उठणारा एक 'युवानेता'. सोशल मीडियावर नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'युवानेता' चित्रपटाच्या पोस्टरने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. लक्षवेधी शीर्षकामुळे तरुणांमध्ये चित्रपटाबद्दल कमालीची उत्सुकता दिसत आहे. चित्रपट 23 ऑगस्ट 2024 रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. महाविद्यालयातील अंकुर मित्रांसमवेत अन्यायाविरुद्ध नेहमी लढा देतो. अंकुरची वाढलेली लोकप्रियता स्थानिक आमदारास खुपू लागते. आमदार आपली शक्ती वापरून अंकुरला दाबण्याचा प्रयत्न करतो. मात्र अंकुर न दबता तेवढ्याच त्वेषाने उभारी घेतो. या सर्व गदारोळात मित्र, प्रेम आणि नाती हरवतात का? आणि त्यांची किंमत मोजावी लागते का? हे चित्रपटात प्रकर्षाने कळणार आहे.

## सिंहगड रोड परिसरातील "ट्रॅफिक जाम" वर उपाययोजना करा

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वाहतूक विभागास निवेदन
- प्रसंगी शिवसैनिक स्वयंसेवक म्हणून मदत करण्यास तत्पर असल्याची दिली ग्वाही



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघातील सिंहगड रोड परिसरातील वाहतूक समस्येबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सिंहगड रोड वाहतूक विभागास निवेदन देण्यात आले. शिवसेनेच्या शिष्टमंडळाने वाहतूक शाखेच्या प्रमुख राणी डफळ यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी वाहतूक नियोजनाच्या संदर्भामध्ये अनेक सूचना पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आल्या. तसेच गर्दीच्या वेळेस आवश्यकता भासल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसैनिक स्वयंसेवक म्हणून वाहतूक शाखे सोबत काम करायला तयार आहे असे देखील पदाधिकारी यांनी सुचवले. नवले ब्रिज, वडगाव ब्रिज ,सनसिटी, नऱ्हे ,नांदेड सिटी या ट्रॅफिक जाम हॉटस्पॉट वर तातडीने उपाययोजना करून वाहतूक कोंडी सोडवावी. अशी विनंती वाहतूक शाखेला करण्यात आली. याप्रसंगी महिला आघाडीच्या सौ. मुग्धा पासलकर,उपशहर प्रमुख भरत कुंभारकर,शहर संघटक संतोष गोपाळ,युवा सेना जिल्हाप्रमुख तथा निवडणूक समन्वयक सचिन पासलकर,विधानसभा प्रमुख नितीन वाघ, माजी तालुकाप्रमुख संदीप मते पाटील, अमोल दांगट राजू चव्हाण,राजेंद्र पायगुडे,विनायक आप्पा नलावडे,सिद्धार्थ पिसाळ, महेश विटे, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय जोरकर,धनंजय खाडे, विठ्ठल लांडगे, नाना मरगळे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## थोडक्यात



### डॉ मणिभाई देसाई पतसंस्थेला 'दिपस्तंभ पुरस्काराने' सन्मानित

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** तेलंगण राज्यातील हैद्राबाद येथील रामोशी फिल्मसिटी येथे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर व दिपस्तंभ पुरस्कार वितरण सोहळा नुकताच संपन्न झाला. सहकार व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल उरुळी कांचन (ता.हवेली) येथील डॉ मणिभाई देसाई ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे. या पतसंस्थेला दिपस्तंभ पुरस्कार पुणे विभागातून व्दितीय क्रमांक कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, राजश्री पाटील तसेच महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे आदीच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. डॉ मणिभाई पतसंस्थेस राज्यस्तरीय दिपस्तंभ पुरस्कार 2024 ने सन्मानित केले. यावेळी संचालक भाऊसाहेब कांचन, संजय टिळेकर, संजय कांचन, ह.भ.प.जीवन महाराज शिंदे, प्रविण दरेकर तसेच वसुली आधिकारी लक्ष्मण हेंद्रे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पतसंस्थेच्या प्रगतीच्या आलेखात संस्थापक चेअरमन राजेंद्र कांचन, व्हाईस चेअरमन रामदास चौधरी, संचालक व व्यवस्थापक, कर्मचारी, सभासद, ठेविदार, हितचिंतक यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

## विद्यार्थ्यांनी जिंकली राष्ट्रीय स्टेम चॅलेंज 2023-24 साठीची ब्रिलिओ क्लस्टर फेरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिवाजीनगरमधील हुतात्मा बालवीर शिरीषकुमार हायस्कूल आणि भवानी पेठेतील श्री सावित्रीबाई फुले विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी 'ब्रिलिओ नॅशनल स्टेम चॅलेंज 2024'च्या क्लस्टर फेरीत विजय मिळवला आहे. या स्पर्धेचे आयोजन ब्रिलिओ या डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन सर्व्हिसेस व सोल्यूशन्स पुरविणाऱ्या कंपनीने केले होते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्टेम शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या स्टेम लर्निंग या सामाजिक संस्थेनेही या आयोजनात भाग घेतला. हुतात्मा बालवीर शिरीषकुमार हायस्कूलमध्ये झालेल्या क्लस्टर फेरीनंतर या विद्यार्थ्यांचे यश साजरे करण्यात आले. 'स्टेम लर्निंग'च्या चमूने आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मोठे कौतुक केले. हे विजेते आता 27 ऑगस्ट 2024 रोजी बंगळुरु येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विभागीय फेरीत जातील. स्टेम (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) या विषयांमधील विविध उपक्रम यापुढे वर्षभर घेतले जाणार आहेत. त्यांची सुरुवात या स्पर्धेच्या निमित्ताने झाली. यामध्ये विज्ञान आणि गणित मॉडेल स्पर्धा, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी यांची तोंडओळख यांचा समावेश होता. इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल, नावीन्य आणि डिझाइन विचारविषयक कौशल्ये वाढवण्याच्या दृष्टीने ही नॅशनल स्टेम चॅलेंज डिझाइन केलेली आहे. विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी कोणतीही असली, तरी ते या स्पर्धेसाठी पात्र असतात.




# डासांमुळे पसरणाऱ्या रोगांपासून बचाव करण्याबाबत जनजागृती

## बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुरक्षिततेचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाच्या सणाच्या अनुशंघाने ओडोमोस डासांपासून संरक्षण ही मोहीम सुरु करण्यात आली आहे. जशी बहीण आपल्या मनगटावर राखी बांधून आपल्या भावाच्या सुरक्षेची काळजी करते, त्याचप्रमाणे ओडोमोस डासांपासून संरक्षण प्रदान करते. या मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांना बँडचे वाटप करून त्यांना डासांपासून पसरणारे आजार आणि त्यापासून बचाव करण्याबाबत जागरूक केले. डासांपासून होणा-या रोगांविरुद्ध शहराच्या लढ्यात योगदान देत, ओडोमोस, डाबरच्या भारतातील प्रसिद्ध पर्सनल ऐप्लीकेशन मॉस्क्युटो रेपेलेन्ट ब्रँडने सुरक्षा बंधन मोहीम सुरु करण्याची घोषणा केली.

मोहिमेचा एक भाग म्हणून, डाबरने मुलांमध्ये ओडोमोस डासांपासून बचाव करणारी उत्पादनेही वितरित केली. कंपनीने डेंग्यू, मलेरिया आणि चिकुनगुनिया यांसारख्या डासांपासून पसरणाऱ्या आजारांची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंध याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी चर्चासत्राचेही आयोजन केले होते. या उपक्रमावर बोलताना, डाबर इंडिया लिमिटेडचे मॉस्किटो रिपेलेंट, कॅटेगरी हेड श्री संतोष जयस्वाल म्हणाले, "सुरक्षा बंधन मोहीम समाजाच्या आरोग्याला चालना देण्यासाठी डाबर ओडोमोसच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने डासांपासून बचाव करण्याबाबत जनजागृती करून या मोहिमेचा समाजावर सकारात्मक प्रभाव निर्माण झाला. पुणे येथील बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ प्राथमिक शाळेत या उपक्रमाचा शुभारंभ करताना, डाबरने शहरातील शाळकरी मुले, शिक्षक आणि पालकांसाठी एक जनजागृती सत्र आयोजित केले होते, जिथे त्यांना डेंग्यू पसरवणाऱ्या डासांपासून बचाव करण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. ह्यावेळी डाबर इंडियन चे दिनेश कुमार, देशसेवा फौंडेशन चे नरेंद्र पारखे, उपप्रशासकीय अधिकारी शुभांगी चव्हाण, पर्यवेक्षक सौ. आशादेवी धुमाळ समग्र शिक्षा अभियानाच्या दळवी मॅडम नितीन वाणी प्रभारी मुख्याध्यापक, शिक्षिका सुनिता जाधव, संजीवनी सोनार, आशा उंडे, प्रदिप गवळी, स्वाती लोहकरे, सुरेखा खैरे, पुजा घोगरे, अजय कोंढावळे, तुषार तमनर, रोहित सिरसवाल, शाळा क्रमांक 118 बी. चे सर्व कर्मचारी आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रभारी मुख्याध्यापक नितीन वाणी सरांनी डाबर इंडिया चे आभार मानताना त्यांचे कौतुक केले आणि मुलांना ह्या उपक्रमाबद्दल माहिती आणि मार्गदर्शन केले.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.